भाग २

वि स्मरणाचे स्मरण

१. अहा ते सुंदर दिन हरपले	– श्री. भानुदास चुनिलाल शिंपी	५४
२. निर्गुडीची पाने	– भालचंद्र पाठक	५६
३. सर्वांचे मन हरण करणारा माझा मित्र 'मनोहर'	– हिम्मतराव पाटील	५९
४. काव्यासरीता: अर्घ्य ज्ञानसवितेस	– गुरुमाऊलीची सुरु	६३

१. अहा ते सुंदर दिन हरपले

– श्री. भानुदास चुनिलाल शिंपी

दि. ६-११-२०१९

स्वामीजी अकरावीत असताना मी त्यांना तुझी परिक्षा सुरू आहे, दुपारी २ वाजता पेपर आहे. तू अभ्यास न करता खुशाल ह. ना. आपटेची ''पण लक्षात घेतो कोण?'' ही कादंबरी वाचतो आहेस हे चांगले नाही, अभ्यास कर. तेव्हा 'माझा अभ्यास झाला आहे. आता ऐनवेळी अभ्यासाचं नाटक मी करीत नाही. आताचा अभ्यास परीक्षेला कामी येत नाही त्यांनी उत्तर दिले आणि ते खरे आहे असे मी म्हणेन कारण ते एकपाठी आहेत. शाळेत मन लावून शिकायचे घरी तासनतास अभ्यास त्यांनी कधी केलाच नाही.

अकरावीत असताना त्यांनी अमळनेर सेंटरला पहिला नंबर मिळवला त्याची सर्वत्र चर्चा झाली कारण नेहमी प्रताप हायस्कूल किंवा चोपडा हायस्कूलचा मुलगा सेंटरला पहिला यायचा. आमचे बेटावदच्या जनता विद्यालयाच्या तिसऱ्याच बॅचचे हे विद्यार्थी. बेटावद सारख्या खेड्यातील हायस्कूल मधला विद्यार्थी पहिला यावा याचे सर्वांना वैषम्य वाटले.

मॅट्रीक नंतर पुण्याला कॉलेज करायचे त्यांनी ठरवले, पण आमच्या घरची परिस्थिती तशी नव्हती. त्यांनी विद्यार्थी सहाय्यक समिती, पुणे यांना भले मोठे पत्र लिहले अन योग असा की समितीने त्यांना होकार दिला. इतके ते तळमळीने त्यांनी लिहीले होते. ते पत्र त्या समीतीने अनेकांना वाचायला दिले. त्याकाळी १९६३-६४ ला २० रूपये जेवण व १० रुपये खोली भाडे असा समितीचा नियम होता. रू. १०-१० च्या तीन शिकवण्या स्वामीजी करायचे. पुढे दरवर्षी रूपये ७२० त्यांना विद्यार्थी अर्थसहाय्य मिळायचे. M.Sc झाल्यावर ते अर्थसहाय्यचे पैसे कसे परत करायचे म्हणून चौकशीसाठी सरकारी योजने प्रमाणे त्या ऑफिसला गेले. त्या साहेबांनी तुम्ही फार प्रामाणिक आहात. आजपर्यंत कुणीच पैसे परत केले नाहीत तेव्हा काळजी करू नका निघा.

M.Sc ला त्यांचा फिजीकल केमिस्ट्री हा विषय होता. आर्थिक अडचणीमुळे पुस्तके विकत न घेता ती लायब्ररीतून आणून स्वामीजी रात्री १२-१ वाजेपर्यंत जागून त्यांतून टिपणं काढायचे. परीक्षेत विविध पुस्तकांचा संदर्भ द्यायचे. त्यांचे प्रोफेसरही नवल करायचे की खैरनार तुला हे कसे जमते बुवा, कठीण काम आहे तुझे.

एकदा स्वामीजी त्यांच्या गुरूमहाराजांना बाकीच्या शिष्यांदेखत म्हणाले बाबा भगवतीच्या कृपेने आम्ही पायी प्रवासात आणि अज्ञातवासाच्या काळात एकदाही उपाशी राहिलो नाही. त्यावर त्याचे गुरूमहाराज म्हणाले, खरे तर भगवतीच्या कृपेने नव्हे तर तुझे वडिल जे अन्नदान करायचे त्याचे फळ तुम्ही सर्व भावंडे उपभोगत आहात. आम्ही बेटावदचे (जिल्हा धुळे) गुरूमहाराज छपऱ्याचे (बिहार) त्यांना हे समजणे अगम्य आहे.

स्वामीजी पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजचे विज्ञान शाखेचे विद्यार्थी होते खरे, परंतु सुरुवातीपासून त्यांना विविध अंगी वाचनाचा खूप छंद असल्याने साहित्य क्षेत्रातही गोडी! या अनुषंगाने फर्ग्युसन कॉलेजमध्ये असलेल्या साहित्य मंडळाच्या कार्यक्रमात ते नियमित भाग घ्यायचे. त्या मंडळात महाविद्यालयातील

विद्यार्थी-विद्यार्थिनींनी लिहिलेल्या कथा-कविता यावर आठ-पंधरा दिवसातून एकदा चर्चा व्हायची. अधून-मधून महाविद्यालयाबाहेरील लेखक व कवी देखील कार्यक्रमाकरिता बोलविले जायचे.

अशाच एका कार्यक्रमात त्या काळातील ज्येष्ठ नाटककार व कलावंत श्री. बाळ कोल्हटकर यांना बोलाविण्यात आले होते. त्यांच्या भाषणात सुप्रसिद्ध लेखक आचार्य प्र. के. अत्रे यांचे त्या काळात गाजत असलेले नाटक, 'तो मी नव्हेच' चा उल्लेख आला त्यावेळी श्री बाळ कोल्हटकर म्हणाले, 'तो मी नव्हेच हे नाटक एका दृष्टीने अपयशी ठरले आहे, कारण त्यातील मुख्य भूमिकेत असलेले खलनायकी पात्र अर्थात लखोबा लोखंडे याच्याबद्दल लोकांना तिरस्कार न वाटता त्याच्या हुशारीचे कौतुक वाटू लागते हे लेखकाचे मोठे अपयश आहे म्हणून लेखकाचा प्रयत्न निरर्थक ठरलेला आहे.' हे ऐकून स्वामीजींनी श्री. कोल्हटकरांना प्रश्न विचारला, आपण हे गृहीत धरले आहे की त्या पात्राबद्दल लोकांच्या मनात तिरस्कार उत्पन्न व्हावा, असाच लेखकाचा उद्देश असेल, पण दुसऱ्या दृष्टीने जर बघितले तर लेखकाचा उद्देश असाही असू शकतो की समाजात अशी चतुर व ठगणारी माणसे देखील आहेत व त्याच्यामुळे लग्न न झाल्यामुळे हताश व निराश झालेल्या मुलींनी घाई गोंधळ न करता सावधपणे तपास करूनच त्यांच्या पुढील आयुष्याच्या संबंधी निर्णय घ्यावेत. समाजातील वय वाढलेल्या परंतु अविवाहित स्त्रीयांना सावधानतेचा इशारा देणे व त्यांना अशा धोक्यांपासून सावध करणे हा त्या लेखकाचा उद्देश असू शकतो. हा उद्देश जर लक्षात घेतला तर लेखकाचा प्रयत्न किंवा उद्देश अयशस्वी झाला असे खरेच म्हणता येईल का? यावर श्री. बाळ कोल्हटकर निरुत्तर झाले व म्हणाले या दृष्टीने विचार केल्यास तुझे चिंतन बरोबर आहे.

श्री. भानुदास चुनिलाल शिंपी.
मु.पो.ता. पाचोरा, जि. जळगांव
४२४२०१ महाराष्ट्र.

२. निर्गुडीची पाने

–श्री. भालचंद्र पाठक

सूर्यं नारायणं देवं सच्चिदानंद सद्‌गुरूम् ।
अज्ञानतम नाशाय वंदे सर्वात्मकं रविम् ।।१ ।।

हा गुरुची महती सांगणारा एक श्लोक आहे. तो अज्ञानतमाचा नाश करतो आणि तो सर्वात्मक आहे. या दृष्टीने 'सवितानंद' या नावाकडे पाहिलं पाहिजे. यात एक खगोलीय सत्यही दडलेले आहे. सूर्य स्वयंप्रकाशी आहे, चंद्रही प्रकाश देणारा आह; दोघेही एकाच आकाशात वस्ती करून आहेत पण एकाच्या भोवती पृथ्वी फिरते तर दुसरा पृथ्वीभोवती फिरतो. सूर्यापासून प्रकाश मिळवून चंद्र पृथ्वीला प्रकाश देतो. दोघांचेही कार्यक्षेत्र पृथ्वीसाठी महत्त्वाचेच आहे. पण एक स्वयंप्रकाशित तर दुसरा परप्रकाशित आहे. नमनालाच घडाभर तेल अशासाठी खर्ची घातले आहे की स्वामीजी 'सविता' नंद तर मी भाल 'चंद्र' . माझ्याजवळ जे आहे, ते सर्वच स्वामीजींकडून घेतलेले आहे आणि याचा मला अभिमानही आहे.

१९५७–५८ ला आम्ही उभयता इयत्ता ७ वीत एकाच शाळेत (बेटावद, ता. सिंदखेडे, जि. धुळे, महाराष्ट्र राज्य) पण वेगवेगळ्या तुकडीत होतो. स्वामीजी उत्तम गुणांनी सातवीची परीक्षा उत्तीर्ण झाले तर अस्मादिक चांगलेच आपटले, अर्थात अनुत्तीर्ण झालो. आठवीत मात्र आम्ही एकाच तुकडीत आलो. तेव्हा सातवीत शाळेतही आणखीन एक परीक्षा होत होती. मी जरी व्हर्नाक्युलर फायनलला अनुत्तीर्ण झालो तरी शाळेतल्या परीक्षेत पास होऊन 'आठवीत जाण्यास लायक' या शेऱ्यानिशी हायस्कूलला दाखल झालो. या सुमारास माझ्या आईवडिलांना एक गोष्ट लक्षात आली होती की मी अभ्यासात साधारण असून मला चांगल्या हुशार मुलांच्या संगतीत ठेवले पाहिजे. हे सत्य कळून चुकल्यामुळे माझ्या आई वडिलांना हेतूपूर्वक मला मनोहर, जयवंत अशा हुशार मुलांशी मैत्री करण्यास प्रोत्साहित केले.

तेव्हा आमच्या शाळेचे पहिले मुख्याध्यापक होते, कै. ल. ह. तथा काकासाहेब भाकरे सर. हे अत्यंत विद्यार्थीप्रिय शिक्षक होते. तेव्हा मुख्याध्यापकांनीही त्यांचे तास घ्यायची प्रथा होती. भाकरे सर आम्हाला इतिहास, संस्कृत हे विषय शिकवीत, त्यांची शिकवण्याची पध्दत अतिशय प्रभावी होती. संस्कृतचा एक श्लोक फळ्यावर लिहून मुलांकडून वाचून घेत व त्याचा अर्थ विचारीत. आम्ही आपले काही तरी एखादा शब्द पकडून त्यावरून अर्थ लावण्याचा प्रयत्न करीत असू. आम्ही काहीही उत्तर दिले की ते ''आले की तुला. अगदी बरोबर'' म्हणून आमचा उत्साह वाढवीत. आम्हाला 'आपल्याला खूप काही कळते' असा भ्रम होई. पण नंतर ते स्वत: जेव्हा अर्थाचे स्पष्टीकरण करीत, तेव्हा आम्ही 'बरोबर' म्हणजे नेमके कुठे, ते कळत असे. त्या काळी त्यांनी शिकवलेले संस्कृत, संस्कृतचे व्याकरण आजही ताजे आहे.

शाळा व माझे मित्र त्यातही स्वामीजी अजूनही माझे जीवन व्यापून आहेत. मग शाळेचे हस्तलिखित असो, त्यात आम्हाला झेपतील असे विषय देऊन, पुस्तके उपलब्ध करवून देऊन, लेख लिहवून घेत. त्यात आजही स्पष्ट आठवते, स्वामीजी कोणत्याही पुस्तकाचा आधार न घेता स्वयंप्रज्ञेने लेखन करीत व ते लेखन हस्तलिखितात अग्रभागी असे. त्यांचे वाचन अफाट असे. बाजारपेठेत त्यांच्या वडीलांचे कपड्याचे दुकान होते. शाळा सुटे तेव्हा गिऱ्हाइक कमी म्हणून वडील घरी जात. दुकान या पठ्ठ्याने चालवावे. भाव व कपडा मोजून देणे, हिशेब करून पैशांची देवाण घेवाण करणे, हिशेब स्लेटपाटीवर लिहून ठेवणे आणि गिऱ्हाइक नसे त्या काळात पुस्तके वाचणे हे सारे पाहून आम्ही अवाक् होऊन जात असू

या अनेकानेक स्पर्धात मला विशेष स्मरण आहे ते एकाकिकांचं, कै. वि. ग. कुलकर्णी या सरांकडे त्यांच्या रूमवर आम्ही जमत असू. १०/१२ नाटीका तिथे असत. आम्ही त्या 'ए मला तोफेच्या तोंडी दे रे' म्हणून त्या साऱ्या वाचत असू. मग एखादी नाटीका निवडली जायची. पात्र वाटप होई. पाठांतर जास्त असे ते पात्र स्वामीजींना मिळे. त्यांचं पाठांतर, वाचन अफाट होते. कित्येक वेळा तर भले मोठे पुस्तक त्यांच्या हाती पाहून, ते पुस्तक ते खरोखरीच वाचतात की नाही अशी शंका येई. मग त्यांची परीक्षा आम्ही घेत असू. पण स्वामीजी कसले पक्के! सर्वांना पुरून उरत. आमच्या शाळेला ''शाळेसाठी'' या नाटीकेने जिल्ह्यात दुसरा क्रमांक मिळवून दिला. मी मुस्लिम मुलाच पात्र – जमालचे पात्र केले हाते. तो खरेच मंतरलेला काळ होता. खूपच शिकायला मिळाले.

सगळ्याच शालेय विषयात स्वामीजी प्रथम असत. पण एक विषय असा होता, जिथे स्वामीजींना ग्रेस मार्क देऊन पास करून घेतले जाई, तो विषय होता चित्रकला. श्री. व्ही.के. बोरसे सर पेपर वाटताना स्वामीजींचा पेपर झाकून घेत. एक अक्षर आणि दुसरी चित्रकला ह्या प्रांतात स्वामीजी सपशेल हरलेले असत. तिथे आमचा बऱ्यापैकी वट चाले. किती आठवणी सांगू? या प्रत्येक आठवणीत स्वामीजी ठसठशीतपणे आमच्या मनात, स्मृतीत अजरामर आहेत. त्यातील एक अतर्क्य घटना ज्याचे रहस्य मला अजून उलगडले नाही ती आता सांगतो. त्यावेळी आम्ही मॅट्रिकला होतो. एके दिवशी आम्ही सर्व मित्र गप्पा मारत असताना गप्पांच्या ओघात मी मला रात्री पडलेले स्वप्न सांगू लागलो. स्वप्नाचा काही भाग सांगून झाला आणि स्वामीजींनी मला थांबवले व म्हणाले ''थांब पुढील भाग मी सांगतो'' व स्वप्नाचा उर्वरीत भाग अगदी जशाचा तसा सांगितला. मला आजही हे कळत नाही की हे स्वप्न मी पाहीले की स्वामीजींनी? त्या वेळी खूप आश्चर्य वाटले त्या विद्यार्थीदशेमध्ये अध्यात्माचे जे ज्ञान त्या काळी नव्हते त्यामुळे स्वामीजी जे आमच्यातील एक असूनही त्यांचे जे वेगळेपण तेव्हा लक्षात आले नव्हते ते आत्ता उमगले.

एस्.एस्.सी. ला आम्ही अमळनेर केंद्र घेतले हाते. माझे मामा तिथले. मी व स्वामीजी माझ्या मामांकडे उतरलो. माझ्या आईने आमची सोय लावली. जेवण वगैरे सर्व आवरून तिने वेळेत परीक्षेला पाठवावे. रहायला गावात तर परीक्षा केंद्र रेल्वे स्टेशन जवळ, प्रताप हायस्कूल. परीक्षा संपल्या. माझ्या समोर काही प्रश्न, समस्याच नव्हत्या. कारण गणितात आम्हाला पास होऊ अशी पुसटशी शंकाही नव्हती. पण स्वामीजी एस्.एस्.सी. नंतर पुढे काय? या विवंचनेत. रिझल्टच्या आदल्या दिवशी मी थेट अमळनेर गाठले. पहाटे रेल्वे स्टेशनवर जाऊन पेपर विकत घेतला. आमचे नंबर पेपरात शोधू लागलो पास क्लासमध्ये थरथरत्या हाताने नंबर शोधू लागलो तर स्वामीजींचाही नंबर नव्हता. माझा तर नव्हताच. तिथेच रडारड सुरू झाली. पण आम्हाला आमचा नंबर नव्हता, याचं वैषम्य नव्हत स्वामीजीही जिथे नापास तिथे आम्ही कोण? स्वामीजींचा नंबर नव्हता केव्हढं समाधान होतं मनाला! मग पुन्हा थरथरत्या हाताने सेकंड क्लास पाहिला. तर तिथे माझा नंबर आढळला. मग हिंमत येऊन फर्स्टक्लास बघितला तिथे स्वामीजींचा नंबर होता. उत्तम मार्कस् मिळावून स्वामीजी जळगाव व धुळे या जिल्ह्यातून प्रथम आले होते. त्यांचे खूप कौतुक झाले. स्वामीजी पुण्याला शिक्षणासाठी निघाले. विद्यार्थी सहाय्यक समिती, पुणे या संस्थेत त्यांची सोय झाली.

इथून आमच्या वाटा वेगळ्या झाल्या. आता भेटी सहा सहा महिने होई ना! स्वामीजींच्या भेटीसाठी दिवाळी, उन्हाळी सुटीची अधीरतेने वाट बघितली जाऊ लागली. आमचा नियमित पत्रव्यवहार होता. अभ्यास, परीक्षा, मित्र याबाबत एकमेकांना कळवीत असू. आमचे आपले बेतास बात होते. स्वामीजींनी कष्टाने, स्वत:च्या बळाने, आपल्या पायावर शिक्षण घेतले. आम्ही दुसऱ्या वर्षी पुण्याला जाऊन आलो. स्वामीजींच्या ओळखीने सुप्रसिध्द कादंबरीकार ना.सी. फडके व शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या भेटी झाल्या. श्री बाबासाहेबांच्या भेटीने शिवचरित्राची गोडी लागली. त्यांच्या पुस्तकांच्या वाचनाने मी शिवचरित्र सांगू लागलो. कै. ना.सी. फडके यांच्या वर्णन शैलीची मला मोहिनी पडली. आपणही लिहावे असें वाटू लागले. कॉलेजचेच दिवस होते, पण माझा सर्वात आवडता लेखक रणजित देसाई. त्यांना भेटता आले नाही

पण स्वामीजी पुण्याहून येत तेव्हा विषय निघे. आम्ही सारे मित्र सायंकाळी फिरायला जात असू तेव्हा लेखक व त्यांच्या साहित्यकृती हाच गप्पांचा विषय असे. त्यांचे लेखन आम्हाला वाचायला मिळेना पण स्वामीजी 'करतळी आवळा' अशा स्टाईलने वर्णन करीत. त्यात मुख्य विषय रणजित देसाईंचा व इतरही लेखकांचाच असे.

कॉलेज जीवन संपले आम्ही पोटापाण्याच्या प्रश्नासाठी नोकऱ्या शोधल्या. माझ्यावर घरची जबाबदारी जास्त. मी गावीच हायस्कूलला लागलो. बी.एड्. व्हायचे होते. एक वर्ष नोकरी करून धुळ्याला बी.एड्. ला गेलो. परत येऊन कुठे तरी शहरात नोकरी करण्याचा मानस होता. पण बी.एड्. ला असतानाच मातोश्री गेल्या. स्वामीजींना कळवायलाही वेळ मिळाला नाही. आई धनुर्वाताने अचानक गेली. मनी मानसीही असे काही होईल असे वाटले नव्हते. पण न कळवताच बरोबर तिसऱ्या दिवशी दुपारी मनोहर आला अचानकच. अश्रूंचा बांध फुटला. सांत्वन काय असतं ते कळलं. त्यानंतरही बहिणीच्या लग्नालाही तो असाच अचानक बरोबर आला. खूप बरं वाटलं. मग मध्यंतरी माझे दोनाचे चार झाले. त्यावेळीही स्वामीजी उपस्थित होते. कालांतराने त्यांचेही दोनाचे चार झाले. संसार सुरू झाले, पण कुणी त्यात रमलेच नाहीत. पाण्यात वाळू टाकली तर ती ओली होते पण विरघळत नाही तसं झालं होतं.आता तर भेटीही दुर्मिळ झाल्या. कुणालाच वेळ नसे. दिवस जायचे तसे जात होते.

काळ बराच पुढे निघून गेला होता आणि एके दिवशी अचानक स्वामीजी रात्री मुक्कामाला आले. ते कधीही आले तर घरी फक्त जेवायला, झोपायला जात. सर्व वेळ माझ्याकडेच असत आजच्या रात्री तर ते घरी गेलेही नाहीत. बरोबर सामान म्हणाव अस काही नव्हतेच. रात्री नदीवर गेलो. भरपूर गप्पा मारल्या पण त्यात काही मजा नव्हती. कळले एवढेच की उद्यापासून ते गुरू शोधायला निघणार आहेत. रात्री माझ्याच घरी दोघे झोपलो. पहाटे त्यानीच उठवले. दोघांचीही स्नाने झाली. एक छोटीशी पिशवी आणि मृगाजिनाचा गुंडाळा, कमरेला लुंगी सारखे धोतर, अंगात शर्ट. एकमेकांचा परिचय नसल्यासारखे सोबत चालत होतो मौनाने. दोन किलोमीटर नरडाणे रस्त्याला गेलो. थांबलो, ते म्हणाले, आता किती वेळ चालशील तू?' 'चल मी निघतो.' मी खाली वाकून नमस्कार केला. डोळे पाण्याने डबडबलेले होते. पण ते अपरिचितासारखा पाठीवर हात ठेऊन मागे न पाहता निघाले दूर निघून गेले मी थांबून अवाक् होऊन पहात राहीलो . मग काही वार्ता समजेना. प्रवास कसा झाला. कुठे झाला. काय कमावले? काहीच नाही.

अचानक पुस्तक हाती आले ''गुरूर्ब्रह्मा.....'' मधली दरी भरून आली. मग अशीच पुस्तके माझ्यापर्यंत येत राहिली. स्वामीजींची कमाई हळू हळू कळू लागली. मित्र होतो, एकमेकात पूर्णत: विरघळलेले. पण अचानक स्वामीजींनी निवडलेला मार्ग कळेना. मला त्यांचा मार्ग पसंत नव्हता. आमच्यात दुरावा निर्माण झाला होता पण हळूहळू खरी परिस्थिती समोर आली. धुक्याचं पटल विरावे तसा गैरसमज दूर झाला. आता निखळ आदर आहे. आता भेटी होतात पण मैत्री संपली. मित्राचं स्थान हृदयात असतं. भेटी उराऊरी होतात. आता स्वामीजी खूप उंच झाले आहेत. आता भेटीत मी त्यांच्या पावलांवर मस्तक ठेवतो. आदराने नमस्कार करतो. आता स्वामीजी क्वचितच घरी येतात. मैत्रीचं बोलणं तर राहिलंच. साध बोलणं पण अंतर राखून. मित्रांनो अशी आहे आमच्या मैत्रीची कथा. लिहायचं होतं स्वामीजींसाठी स्वामीजींबद्दल पण मधेच बराचसा मी डोकावलो आहे. पांडुरंगाबद्दल कधी लिहून पहा केव्हा नामदेव डोकावतो कळतही नाही. तुकड्या तुकड्यांच चित्र असत ते जुळवून पहा. चित्र पूरं करायला जावं तर मागे नकाशा आपसुक तयार होतो. तसे या मधे मधे मी आलो आहे.

आता मी ही ७४ चा उंबरा फेब्रुवारीत ओलांडतो आहे. माझीही पंचाहत्तरी आहे. आम्ही दोघेही बरोबरीचे.

तुमच्या चरणांवर वाहायला बेलपत्रही नाहीत! आहेत ही निर्गुडाची पाने तीच भक्तीभावाने वाहतो. इत्यलम्।

३. सर्वांचे मन हरण करणारा माझा मित्र 'मनोहर'

– श्री. हिंमतराव हि. पाटील, अंबरनाथ

स्वामीजींशी मराठी शाळेपासून माझा संबंध आला ते हुशार, एकपाठी, प्रगाढ बुध्दीमत्तेचे आमचे सर्वांचें आवडते. श्री. लक्ष्मण शंकर शिंपी गुरुजी हे मुलांच्या हितासाठी दुपार नंतर फक्त गणित विषय घ्यायचे. गणित सोडवताना ज्यांचे गणित चुके त्यास छडीने हातावर मार बसे. वर्षभर सर्वांनी अनेकदा छडीचा प्रसाद घेतला पण स्वामीजी आणि मी कधीही छडीप्रसाद घेतला नाही. प्रसंगी स्वामीजी काही शिक्षकांना त्यांच्या चुकाही सहजपणे लक्षात आणून द्यायचे. बेटावदला ग्रामपंचायतीची मोठी लायब्ररी होती. बाहेर गावच्या व्यक्तींना पुस्तके वाचायला मिळत नसत पण स्वामीजींच्या ओळखीने मला लायब्ररीतून केव्हाही पुस्तक मिळत असे.

माझे गाव बरोबरच्या पांझरा नदीच्या पैलतीरावर होते. स्वामीजींचे गाव बेटावद ता. सिंदखेडा जि. धुळे जिल्ह्याचे शेवटचे गाव पांझरा नदीकाठी, लोकसंख्या पंधरा हजार तर माझे गाव नदीच्या पैलतीरी भिलाली ता. अमळनेर जि. जळगांव लोकसंख्या अवघी पंधराशे जळगाव जिल्ह्याच्या सीमेवर असलेले, नदीपात्र चांगले रुंद. पावसाळ्यात नदीला चार-पाच वेळा पूर येत असे. तेव्हा मात्र भिलालीच्या मुलांना अडीच कि.मी. चालत जावे लागे. सातवीच्या वर्गात स्वामीजींची व माझी चांगली मैत्री झाली. माझा एक चुलत भाऊ अमळनेर कॉलेजला शिकत असल्याने आठवी पासून मी प्रताप हायस्कूल अमळनेरला प्रवेश घेतला. स्वामीजी अकरावी पर्यंत बेटावद हायस्कूलमध्ये तरी पण दिवाळी व उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये संध्याकाळी आम्ही पाच-सहा मित्रांचे एकत्रित फिरणे असायचे. नदीपात्र खूप रूंद व बारामाही पाणी असणारे त्यामुळे नदीपात्रात डांगर, टरबूजाचे मळे असायचे. आठवड्यातून तीन-चार दिवस या मळ्यात आम्ही जायचो. ताजे ताजे डांगर टरबूज माळ्याकडून कापून गार करून सर्वजण गप्पा-गोष्टी, थट्टा-मस्करी व इतर अनुभवांची देवाण घेवाण करीत ताज्या फळांचा आस्वाद घ्यायचो. त्यावेळची ताज्या फळांची गोडी व रूची हल्ली पूर्णपणे हरवली आहे. ती मजा काही औरच होती, सायंकाळी दिड-दोन तास मजेत जात. स्वामीजींच्या घरी कडक शिस्त, त्यामुळे घरी आठच्या आत जावे लागे. आमची मैफल साडेसात वाजता संपवावी लागे.

१९६३ ला आम्ही मॅट्रीक म्हणजे अकरावीला होतो. स्वामीजींनी परीक्षेसाठी अमळनेर केंद्र घेतले होते. त्यावेळी ते केंद्रात व धुळे आणि जळगांव जिल्ह्यात पहिले आले होते. ते फार मोठे यश होते. खेडेगावातील शाळा, कुठलीही शिकवणी नाही. गाईडचा वापर नाही वा रात्रंदिवस अभ्यासही नाही पण कुशाग्र बुद्धिमत्ता, तीव्र ग्रहणशक्ती आणि स्मरणशक्ती, एकपाठी मुळे ते केंद्रात सहजपणे पहिले आले. सर्वांना आश्चर्याचा अपेक्षित सुखद धक्का बसला आम्हा सर्वांना व गावातील लोकांनाही या यशाने खूप आनंद झाला.

स्वामीजींचे आमच्या घरी लग्नकार्यात शुभप्रसंगी व इतर सवडीच्या वेळी येणे जाणे होते. आमच्या खान्देशात आंबे व इतर फळे विपुल प्रमाणात होती. आंब्याच्या दिवसात आमरस पुरणपोळी त्यावर साजूक तूप, कटाची आमटी भात हे खास जेवणाचे वैशिष्ट्य, सोबत गरम गरम भजी पण असत. आमरस पुरणपोळीच्या जेवणासाठी स्वामीजींना दरवर्षी आमंत्रण असायचे. घरची आर्थिक स्थिती मध्यम व मोठे कुटुंब त्यामुळे

मॅट्रीकनंतरचे शिक्षण घेण्यासाठी स्वामीजींनी स्वत:च्या पायावर उभे राहून पुढील शिक्षण पुण्यास जाऊन घ्यायचे ठरवले. सर्व माहिती आधीच घेतली होती. त्यानुसार ते विद्यार्थी सहाय्य समितीच्या होस्टेलला राहण्यास गेले. होस्टेलच्या मेसमध्ये एकवेळ जेवण वाढायचे काम करून स्वत:च्या दोन्ही वेळच्या जेवणाची सोय केली. मुलांच्या शिकवण्या घेऊन अत्यावश्यक खर्चाची सोय केली. फर्ग्युसन कॉलेजला सायन्सला त्यांनी ॲडमिशन मेरिटच्या जोरावर मिळवली. सुट्यांमध्ये गावी न जाता काही ना काही कामे करून स्वामीजी अर्थाजन करीत असत. साहित्यिक व नामांकित सेवाभावी व्यक्तींशी स्वत:हून परिचय करून घेत त्यांनी स्वत:चा खूप मोठा जनसंपर्क वाढवला. जिद्दीने व कष्टाने फर्ग्युसन कॉलेजमधून B.Sc व पुणे विद्यापीठातून M.Sc प्राविण्यासह उत्तीर्ण झाले ही ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठीही खरोखरच अभिमानाची गोष्ट होती.

मी अमळनेर प्रताप कॉलेजमध्ये होतो. पहिल्या वर्षाच्या परीक्षेनंतर मे महिन्यात आम्ही चार मित्र (श्री. भालचंद्र पाठक, भामरे इ.) पुणे पाहण्यासाठी स्वामीजींकडे गेलो. सुट्यामुळे मुले नसल्याने त्याच्या होस्टेलवर राहायची सोय झाली. त्यांनी तीन दिवस आम्हास पुणे शहर दाखविले. पुण्यातील सर्व प्रेक्षणीय स्थळ दाखविली. शनिवार वाडा, पेशवे पार्क, पर्वती, एस्.पी., फर्ग्युसन कॉलेज, पुणे विद्यापीठ, इंजिनियरींग व मेडीकल कॉलेज, नाट्यगृह इ. पर्वतीवरून पुण्याचे विहंगम दृश्य, संध्याकाळ नंतर लाईटींग बघून खूप आनंद वाटला. खेड्यातून प्रथमच एवढ्या मोठ्या ऐतिहासिक शहरात आलो होतो. ट्रॅफीक पोलीसांनी हात दिल्यावर चौकात चार-पाच लाईनमध्ये थांबणाऱ्या लांबच लाब सायकलींचा थवा बघून मजा आली. प्रत्येक ठिकाणाची सविस्तर माहिती स्वामीजी देत असत.

पुढे प्रताप कॉलेज अमळनेर येथून इंटर सायन्स नंतर पुढील इंजिनिअरींगचे शिक्षण घेण्यासाठी मी व माझा मित्र मधुकर चौधरी एके दिवशी सकाळी अमळनेरहून निघून रात्री नऊ वाजता शिवाजीनगर, पुणे येथे पोहोचलो तेव्हा स्वामीजींनी आमची राहण्याची सोय शनिवार पेठेतील त्यांचा मित्र श्री. श्रीकांत खडदकर याचेकडे केली. त्यानेही तुमची व्यवस्था लागेपर्यंत तीन-चार दिवस तेथे नि:संकोचपणे राहण्याचे सांगितले. पुण्यासारख्या ठिकाणी ओळख नसतांना त्रयस्थाकडे राहण्याची सोय होणे हे केवळ स्वामीजींच्या ओळखी व संबंधामुळे शक्य झाले. गरजेच्या वेळी कोणालाही सहकार्य करण्यास स्वामीजी नेहमी तत्पर असत.

पुण्यात इंजिनिअरींग कॉलेजला प्रवेश घेतल्यावर पुढील चार वर्षे आमचा नियमित संपर्क असायचा. पुढे दोन वर्षांनी ते परत पुण्यास किर्लोस्कर कन्सल्टन्सीमध्ये चीफ केमिस्ट म्हणून लागले. रहायला जवळच असल्याने आठवड्यातून एक-दोन वेळा भेटणे व फिरणे व्हायचे. गप्पांमधून अनेक विषयांची नवीन माहिती आमच्या ज्ञानात भर पडायची. इंजिनियरींग कॉलेज होस्टेल मेसमध्ये उत्कृष्ट जेवण व आठवड्यातून रविवारी फिस्ट (मिठाईचे जेवण) असायची. स्वामीजी देखील अधून मधून त्याचा स्वाद घेण्यास येत असत. शेजारीच मुलांनी चालविलेला क्लब होता. क्लबमध्ये खान्देशची मुले बरीच होती, त्यांच्या बहुतेकांशी ओळखी झाल्या होत्या. आम्हास पुण्यात कोणतीही अडचण आली किंवा काही माहिती हवी असेल तर स्वामीजींना विचारायचो. त्याचा सल्ला व मार्गदर्शन हमखास मिळायचे. पुण्यातील त्यांच्या सहवासातील चार वर्षांचा काळ आनंदाचा व मजेत गेला. नंतर ते नगर कॉलेजला प्रोफेसर म्हणून व मी सरकारी नोकरीत नाशिकला रूजू झालो.

डिसेंबर १९७६ मध्ये गृहत्याग करून संन्यास घेण्यास पुण्याहून बेटावदला जाण्यापूर्वी तीन-चार दिवस आधी स्वामीजी नाशिकला माझ्याकडे आले. तेव्हा मात्र निरोप देणे आम्हास खूप अवघड गेले. त्यानंतर सहा-सात वर्षे संपर्क नव्हता. माझी बदली नाशिकहून जळगावला झाली. बहुदा १९८१ साली एके दिवशी मधल्या वेळेत अचानक दाराची बेल वाजली, दार उघडून पाहतो तर आश्चर्याचा धक्का बसला. साधू वेषात अनवाणी, दाढी व डोक्यावरचे केस वाढलेले व गळ्यात एक मोठी शबनम बॅग असलेले स्वामीजी उभे. प्रथमच

मित्रास शुभ्रवेषात पाहीले. चेहऱ्यावर साधनेचे तेज आले होते. गिरनारचे खडतर तप नंतर बिहारमध्ये प्रत्यक्ष गुरूंची भेट, तेही अधिकारी पुरूष साक्षात माँ पार्वतीकडून दीक्षा प्राप्त झालेले, प.पू. शक्तिबालक परमहंस यांच्या संदर्भात त्या भेटीत माहीती मिळाली. गुरूआज्ञेमुळे ते परत महाराष्ट्रात आले होते. त्या रात्री त्यांच्या खडतर तपश्चर्येचा सर्व वृत्तांत कळाला. रात्रभर गप्पा सुरू होत्या. केव्हा पहाट झाली कळलेच नाही. नंतर त्यांनी आम्हा सर्वांना ध्यानास बसविले. ध्यानासंबंधी माहीती व सूचना दिल्या. ध्यानानंतर संपूर्ण दिवसभर आम्हाला जागरणाचा थकवा जाणवला नाही. मन आनंदी व उत्साही झाले होते. त्यांचे ज्ञान तर अगाध! त्यावरून त्यांची तपस्या खूप फलदायी झाल्याचे जाणवले. दिवसभर त्यांचेकडून बोधपर अनुभवाचे बोलणे ऐकत होतो. ऐकणारा त्यांच्या सांगण्याच्या शैलीने मंत्रमुग्धच होतो. ते दोन दिवस खूप आनंदात व भारावलेल्या अवस्थेत गेले.

पुढील काळात माझी बदली कल्याणला झाली. १९९८ एप्रिल मध्ये मोठा मुलगा सचिनचे धुळ्यास व जानेवारी १९९९ मध्ये राहुलचे लग्न नाशिकला झाले. दोन्ही कार्यात प.पू. स्वामीजी उपस्थित होते. त्यांचे पहिले पुस्तक '**स्तोत्र मंत्राचे विज्ञान**' प्रकाशित झाल्यावर त्यांचा जनसंपर्क खूप वाढला. भारतभर ते पुस्तक पोहोचले. वाचकांचे फोन व प्रत्यक्ष भेटीचे आमंत्रण येत गेली. पुढे प्रत्येक येणाऱ्या पुस्तकाची लोक प्रतिक्षा करू लागले. त्यांची आजपर्यंत १५ पेक्षा जास्त अनेकविध विषयावरील पुस्तके प्रकाशित झाली आहेत. अनेक संस्था, ट्रस्टकडून व्याख्यानासाठी स्वामीजींना बोलाविले जात आहे. पुणे-मुंबई-नागपूर-नाशिक-कोल्हापूर पासून गुजराथ, राजस्थान, मध्यप्रदेश या राज्यातूनही निमंत्रणे येतात.

माझे एक मित्र श्री. प्रकाश भारंबे ऑर्डीनन्स फॅक्टरीतून निवृत्त झाल्यावर साधनेकडे वळले. एकदा त्यांच्याकडे गेलो असता साधनेच्या संदर्भात विषय निघाल्यावर ते म्हणाले, साधनेत अलिकडे खूप अडथळे येतात. एकाग्रता होत नाही, काही प्रश्न पडतात. पुढे म्हणाले एकदा मला स्वप्नात असे दिसले की साधना पथावर चालताना चुकते कोठे? या पुस्तकात तुमच्या प्रश्नांची उत्तरे मिळतील. हे कोणाचे पुस्तक व शोधायचे कुठे? म्हटल्यावर मी त्यांना म्हटले माझ्याकडे ते पुस्तक आहे. स्वामीजी व त्यांच्या इतर पुस्तकांबद्दल मी त्यांना माहिती दिली. **साधनापथावर चालताना चुकते कोठे?** पुस्तक वाचून तर त्यांना खूप आनंद झाला. त्यांची साधना वाढली, प्रगती झाली. इतरही पुस्तके त्यांनी वाचली. त्यांना स्वामीजींना भेटण्याची इच्छा झाली तेव्हा एकदा स्वामीजी माझ्याकडे आले असता त्यांनाही बोलावून घेतले. त्यांची स्वामीजींशी चर्चा झाली. स्वामीजींनी त्यांना साधने संदर्भात मार्गदर्शन केले. त्यांचे खूप समाधान झाले. अशीच दुसरी घटना. अंबरनाथमधील यशस्वी होमिओपॅथी डॉ. सोनवणे यांचेकडे माझ्या पत्नीच्या कंबरदुखीवर उपचार सुरू होते. तेव्हा डॉक्टरांशी गप्पांमध्ये स्वामीजींच्या 'स्तोत्र मंत्रांचे विज्ञान' पुस्तकात होमिओपॅथी उपचारासंबंधीचे लिखाणाबद्दल बोलणे झाले. डॉक्टरांनी ते पुस्तक वाचण्यास मागितले. त्यांना खूप आवडले. ते म्हणाले होमिओपॅथी बद्दल सखोल ज्ञान असणारी व्यक्तीच अशाप्रकारे लिखाण करू शकते. त्यांनीही स्वामीजींची सर्व पुस्तक वाचली. त्यांनी स्वामीजींचा पत्ता-फोनही माझ्याकडून घेतला आणि एकदा ते तरसाडा आश्रमात स्वामीजींना भेटायला जाऊन आले. कनसाई भागात डॉक्टरांनी स्वखर्चाने 'दत्तमंदीर' बांधून दत्ताची स्थापना केली. डिसेंबर २०१८ मध्ये दत्तजयंतीला स्वामीजींना प्रवचनासाठी तेथे आमंत्रित करण्यात आले होते.

असाच एक कार्यक्रम ठाण्यात ज्ञानेश्वर मंदीरात प. पू. टेंबेस्वामी महाराजाच्या जन्मशताब्दी निमित्त झाला. प्रवचनासाठी स्वामीजींना आमंत्रित केले होते. दोन्ही मुलांसह मी सायंकाळी स्वामीजींच्या प्रवचनासाठी गेलो होतो. हॉल तुडुंब भरला होता. सुरूवातीला अर्धा तास श्री टेंबेस्वामी वासुदेवानंद सरस्वती यांच्याबद्दल माहीतीपूर्ण प्रवचन झाले व नंतर तासभर 'स्तोत्र मंत्राचे विज्ञान' या पुस्तकासंदर्भात विज्ञानाची सांगड घालत

अनेक रहस्यांचा उलगडा स्वामीजींनी त्यांच्या प्रवचनात केला. सर्व श्रोतृवृंद मंत्रमुग्ध होऊन एकाग्रतेने ऐकत होता. हॉल बाहेरही खूप गर्दी होती. या प्रवचनानंतर खऱ्या अर्थाने ते पुस्तक आम्हाला समजले. कार्यक्रमानंतर सर्वांच्याच तोंडी स्वामीजींची प्रशंसा ऐकायला मिळत होती. याच दिवशी मधल्या वेळात २ ते ४ स्वामीजी माझा नातू म्हणजे सचिनचा मुलगा (वय ८ महिने-जो १४ वर्षे प्रतिक्षेनंतर झालेला) यास भेटण्यास त्याचेकडे (ठाण्यातच) घरी आले. नातवाला त्यांनी बोलावल्यावर तो लगेच त्याच्याकडे गेला. त्यांना लहान मुले फार आवडतात. त्यांच्या दाढीमिशांशी तो खेळत केस ओढत होता. स्वामीजींच्या खेळवण्याला दाद देत होता. माझी पत्नी HPT कॉलेज नासिकला M.A. करीत असताना तिने 'ज्ञानेश्वरी' हा ऐच्छिक विषय घेतला होता. स्वामीजी तिला नेहमी म्हणायचे, 'सिंधू तू ज्ञानेश्वरीवर पीएचडी कर. मी तुला गाईड (मार्गदर्शन) करेन व ज्ञानेश्वरीचे मर्म, तिचे महत्व व खरा अर्थ उलगडून सोप्या पध्दतीने तुला माहीती करून देईन. तिची इच्छाही होती पण या ना त्या कारणाने निर्णय घेणे पुढे पुढे गेले व ते राहूनच गेले.

स्वामीजी लहान मुलांमध्ये खूप छान मिसळतात. त्यांना विनोदी किस्से सांगतात. कोडी सोडवायला देतात. त्यांचा स्वभाव मिस्किल व विनोदी आहे. स्वामीजी म्हणून त्यांच्या सहवासात कुठलाही ताणतणाव न वाटता मोकळेपणा वाटतो. भेटायला येणारे बऱ्याचदा आपली दु:खे, अडचणीबद्दल प्रश्न विचारतात तेव्हा व प्रवचनातही माहिती देताना ते अनेक उदाहरणे देतात. गीता, ज्ञानेश्वरी, तुकाराम-एकनाथांचे अभंग, रामायण-महाभारत आणि इतर गोष्टी तुम्हाला प्रसंगानुसार कसे सुचतात असे मी विचारल्यावर ते म्हणायचे ते मला सांगता येणार नाही. पण ते आपसूक माझ्या तोंडी येतात. **'बोलविता धनी वेगळाची'**. कुठलाही विषय असो ते तो मुद्देसूदपणे मांडतात व प्रवचन दिलेल्या वेळेत संपवतात. ते वेळ काटेकोरपणे पाळतात. त्यांना ती सरस्वतीची मोठी देणगीच आहे.

आरोग्य, अध्यात्म, ध्यान, साहित्य वगैरे कोणत्याही विषयावर लोक त्यांना प्रश्न विचारला असता त्यावर स्वामीजींचे उत्कृष्ट माहितीपूर्ण मार्गदर्शन मिळते व ती ज्ञानाची मेजवानी असते. अडीअडचणीत असलेल्या व्यक्ती, काही सामाजिक संस्था व इतरांनाही ते वेगवेगळ्या प्रकारे मदत करत असतात. दिवसभर कामात व्यस्त राहून सतत बोलत असून व रात्री उशीरा झोपूनही सकाळी लवकर उठणे व साधना आणि नित्यक्रम त्यांचा नियमित सुरू असतो. त्यांच्या चेहऱ्यावर थकवा कधी जाणवत नाही. नेहमी प्रसन्नच दिसतात.

प्रभुरामचंद्रांच्या वास्तव्याने पवित्र झालेले, १२ वर्षातून कुंभमेळा होणारे, दक्षिण भारताची गंगा म्हणून असलेली गोदावरी नदी उगम ज्योतिर्लिंगाचे पवित्र स्थान त्रंबकेश्वर निवृत्तीनाथांची समाधी तपोवन. काळाराम मंदीर अशा अनेक दृष्टीने प्रसिद्ध असलेल्या, स्वातंत्र्यवीर सावरकर, कुसुमाग्रज यांची कर्मभूमी असलेले प्राचीन व ऐतिहासिक वारसा लाभलेल्या 'नाशिक' शहरात प. पू. स्वामी सवितानंदाच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसाचे आयोजन सर्वानाच आनंद देणारे आहे. स्वामीजीचे पहिले पुस्तक स्तोत्र मंत्राचे विज्ञान या पुस्तकामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मा. मोहनजी भागवत यांचा स्वामीजींशी संबंध आला, परिचय व स्नेह वाढला. स्वामीजींचे मौलिक ज्ञान व श्री भागवतजींचे प्रखर राष्ट्रभक्ती व राष्ट्रकर्माचे विचार ऐकण्याचा आपणा सर्वांना लाभ मिळणार आहे. या शुभदिनी स्वामीजींना उदंड आयुष्य लाभो ही शुभेच्छा व प्रार्थना.

४. काव्यसरीता: अर्घ्य ज्ञानसवितेस

– गुरुमाऊलीची सुरु

आषाढ शुद्ध पंचमी या शुभ मुहूर्तावर
अलौकिक एक बाळ जन्मले या अवनीवर
ज्ञानेश्वरीचे नित्य पारायण पंढरपूर वारी
दारीचा याचक रिक्त हातानें न फिरे माघारी
विवेकबुद्धी दयाभाव असे ज्यांच्या अंतरी
जन्म घेतला अशा पुण्यशील दंपतीच्या उदरी
सरस्वतीचा कृपाहस्त सदैव ज्याच्या शिरावर
गतजन्मीचा संन्यासी मी, सांगे बाळ मनोहर
वाचनाचा छंद जडला बालपणापासूनी
अल्पवेळेत संपवी कथा कादंबरी वाचुनी
एकपाठी, मेधावी, स्मरणशक्ती, तीव्र बुद्धी
दिवसागणीक होऊ लागली सद्‌गुणांची वृद्धी
निमीषार्धात सोडवी कूट प्रश्न, गहन कोडी
पूर्वजन्मीच्या संस्काराने भक्तिभावाची गोडी
गुरूजन, मित्र सर्वांच्या गळ्यातील ताईत
लहान-थोर सर्वांना नांव झाले माहित
विनोदी स्वभावाचा गाजावाजा सगळीकडे
कोड कौतुकाचे पडू लागले सड्यांवर सडे
जो-तो म्हणे हा तर बृहस्पतीचा अवतार
आदरयुक्त प्रेमाचे गळ्यात पडती हार
एकटे बसले असता एकदा नववीच्या वर्गात
प्रकटले विवेकानंद असता विचारगर्कात
देश धर्माच्या सेवेस्तव घ्यावा तू संन्यास
दुरीतांचे तिमीर हरण्या जन्म तुझा खास
मॅट्रिकच्या परिक्षेत जिल्ह्यात विजयपताका
नंतरच्या शिक्षणासाठी प्रसंग आला बाका
मागू नको, देऊ नको तुझे तू शिक्षण करी
जन्मदात्याच्या वक्तव्याने गेले विद्यानगरी
सुसंस्कार, धोपट मार्ग आणि चांगुलपणा
दारूण प्रसंगी ताठ राही सहनशक्तीचा कणा
उच्चशिक्षण घेण्या संघर्ष केला जिवापाड
अनुभवाच्या खतपाण्याने बहरून आले झाड
थोरल्या भावाच्या जाचाला कंटाळून पुण्याला
माता-पित्यासमवेत तीन भावंडे आली वास्तव्याला
संघर्षाच्या त्या दिवसांची कथा आणि व्यथा
मन व्यथित करणारी ती एक करूण गाथा
प्राध्यापकाची नोकरी केली काही काळ
तशांत लग्नबंधनाची गळ्यात पडली माळ
निक्षुन सांगितले लग्नाआधी मी घेणार संन्यास
फार अल्पकाळ करीन गृहस्थाश्रमी वास
संसाराच्या वेलीवर फुले उमलली दोन
हळूहळू संसाराचा होत गेला चौकोन
समाधीस्थ वल्लीनाथांचा स्वप्नी दृष्टांत झाला
घरदार सोडण्याचा काल समीप आला
देहत्यागाआधी गुरूंनी सांगितले पित्यासी
पूर्वजन्मीचा योगी जन्मेल तुझ्या घरासी
जड अंत:करणाने मातेने दिली संमती
सिमोल्लंघन करण्या घेतली पावलांनी गती
संन्यास घेण्या संमतीचे द्वार झाले खुले
निजधाम प्राप्त करण्या निघाली दोन पाऊले
मागे वळून न बघण्याचा दृढ निश्चय मनाचा
दत्तजयंतीस प्रारंभ केला पायी प्रवासाचा
दोन जोडी कपडे फक्त आणि ज्ञानेश्वरी
एवढेच सामान जातांना घेतले आपल्याकरी
कठीण प्रवासात मिळे अदृश्य प्रभू कृपा
निराश झालेल्या मनाला देतसे पुन्हा हुरूपा
सद्‌गुरूंचा शोध घेण्या गिरनार क्षेत्री आले
स्वत:स दयाधन दत्तचरणी वाहिले

कधी भेटतील सद्गुरू तगमग होई जिवाची
दत्तास विनवी तूंच घडवी भेट जीव-शिवाची
वास्तव्य कमंडलू कुंडावर होते आठ मास
दोन सत्पुरूषांच्या कृपेचा मिळाला सहवास
गुरूगृही जाण्यासाठी शिकवण पूर्वतयारी
गुरूजींच्या उपदेशामृताने झाली लाभकारी
ध्यानात एकदा प्रकटली तेजस्वी बटू मुर्ती
आवाज आला हेच तुझे गुरू, झाली शोधपूर्ती
एका सुवर्णदिनी गुरूजी म्हणाले, दत्त आज्ञा झाली
गुरूभेटीसाठी जावे तू गिरनार उतरून खाली
सहा महिन्यांनी आले बिहारमधील छपरा ग्रामी
जेथे शिष्य भेटीस आतुर होते गुरु अंतर्यामी
ध्यानातील दर्शनाने ओळख पटली मनी
मनोमन प्रणिपात केला गुरुंच्या चरणी
माँ चे उपासक त्यांचे शक्तिबालक नाव
आदिगुरु माँ बालेश्वरीच्या चरणी असे नितांत भाव
शांत सोज्वळ दयेचा सागर जणू माॅ ची प्रतिमूर्ती
शिष्यकल्याणास्तव जे नरदेह धारण करती
योगी असुनही बालकासमान निरागस आनंदनिधान
शक्तिच्या अंकावर विराजे एक बालयोगी महान
गिरीजेचे लडीवाळ 'बालक' म्हणती त्यांना सर्वजण
सार्थ ज्यांना शोभून दिसे 'शक्तिबालक' संबोधन
गुरूचरणी ठाव मिळता साधनेची उंच भरारी
बंधन तुटले, संपली जन्म-मरणाची वारी
गुरू सेवेत नित्य तत्पर सदा-सर्वकाळ
जणू काही गुरू-शिष्याची एकच अंतर्नाळ
दोन वर्षात संन्यासदिक्षा नांव सवितानंद
अध्यात्माचे पुष्प फुलले वाटण्या मकरंद
गुरूंच्या छात्रछायेत स्वर्गीय सुखाचे सोहळे
बंधनापासोनी उकले गाठी, हर्ष शोक मावळे
गुरूदेव म्हणाले एक वर्ष करावा अज्ञातवास
नाही संपर्क दूर कुठेतरी नव्हे जवळपास
सुमारे तीन वर्षांनी पुन्हा पायी प्रवास
हृदयात सदा असे गुरूमुर्तीचा वास

दिशाहीन चालणे कुठे जावे नसे थांगपत्ता
विश्वास हा सर्व ठिकाणी असे गुरूंची सत्ता
मजल दरमजल करीत मध्यप्रदेश गाठले
अचानक मन:पटलावर 'सिवनी' नांव उमटले
नक्की काय आहे सिवनी व्यक्ती, वस्तू की गांव?
सिवनी नांवाचा मन मस्तिष्कावर झाला अंतर्भाव
सिवनी हे एक गांव याचे पुढे रहस्य उलगडले
माँ च्या आदेशाने तेथे चातुर्मास अनुष्ठान केले
घनदाट जंगल नीरव शांतता हेच ते सिवनी
प्रसन्न वातावरण तेथले देतसे नवसंजीवनी
छोट्या मंदीरी आई भगवतीची प्रतिमा साजिरी
एकटक बघत रहावे अशी गोड गोजिरी
तेथे राहण्या पुजाऱ्याने हलविली नकारघंटा
जावे तेथून अन्य ठिकाणी करू लागला तंटा
याला कारण मंदीर बांधले ते शेठ कंजुष फार
पोटापाण्याची व्यवस्था तो कदापी नाही करणार
स्वामीजी म्हणाले, भगवती करेल सर्व व्यवस्था
आमचा दृढ विश्वास ती काढेल काही रस्ता
शेठजीने नोकराकरवी सर्व शिधा पाठविला
डोळे विस्फारून पुजारी पाहातच राहिला
भगवतीची मर्जी तुम्ही येथे करावा चातुर्मास
खुशाल करावा आपण येथे अज्ञातवास
म्हणे पुजारी शेठजीने एक भाकड गाय दिली
एवढ्या वर्षात ती फक्त एकदाच व्याली.
दूध देत नाही की गाभण राहात नाही
नाना तऱ्हेचे उपाय करून थकलो सर्व काही
स्वामीजींच्या विनंतीवरून निघाली दुधाची धार
पुजाऱ्याच्या आश्चर्याला न राहीला पारावार
स्वामीजी राहिले वनदुर्गेच्या मंदीरी जोवर
दोन वेळ दूध दिले गायीने रोज पेलाभर
करूणामुर्ती गुरूरायाची संकल्पसृष्टी
गायीच्या माध्यमाने केली दुधाची वृष्टी
असा कुठेही जळी स्थळी काष्ठी पाषाणी
गुरूसत्ता सदा सर्वदा असे सर्व ठिकाणी

वात्सल्याचा क्षीरसागर असे जी माऊली
म्हणूनी तीज सार्थ विशेषण असे गुरूमाऊली
याच सिवनी ग्रामी झाली अद्‌भुत ग्रंथ निर्मिती
या रसाळ मनोहर ग्रंथाचा महिमा गांवा किती
गुरूलीलांचे सुंदर कथन **'गुरूलीलामृतात'**
वाचून साधक हरवून जाई भक्तीच्या विश्वात
ओवीबद्ध, ग्रंथपुष्प हे गुरूचरणी वाहिले
कृपादृष्टीने गुरूरायाने शिष्याकडे पाहिले
गुरूआज्ञेचे पालन करून केली ध्यानधारणा
गुरूकृपेने अजून प्रखर होत गेली साधना
दोन वर्षांनी दिली बाबांनी अवधुती दिक्षा
म्हणाले दिगंबर अवस्थेत मागुन आण भिक्षा
त्याच वेळी मिळाले गुरूंकडून भिक्षापात्र
सर्व मिळाले न उरली कसली इच्छा काडीमात्र
म्हणाले बाबा आजपासून तुझा तू स्वछंद
खूशाल जा कुठेही तू, नाही तुला निर्बंध
गुरूआज्ञा प्रमाण मानुनी आले तरसाडा ग्रामी
चातुर्मास संपन्न करून गेले अन्य धामी
अनेकांच्या आग्रहाने गेले सतलासणा
ट्रस्टच्या मदतीने उभा केला दवाखाना
मे १९९४ साली अक्षयतृतीयेला
तरसाडा ग्रामी आश्रम बांधून संपन्न झाला
सूर्यकन्या साधना कुटीर नांव आश्रमाला
तृतीयेपासून सुरूवात केली वास्तव्याला
साधना झाली, जनकल्याणार्थ देह झिजवावा
भरकटलेल्या साधकाला सन्मार्ग दाखवावा
यास्तव स्वामीजींनी लेखणी घेतली हाती
लेखणीतून स्त्रवू लागले स्वानुभवाचे मोती
ऋषीमुनींचे मानवजातीवर असंख्य उपकार
तपस्येच्या योगाग्नीतून मंत्र प्रकटली फार
शुद्ध हेतू या मंत्रांद्वारे जडजीवांचा उध्दार
संकटकाळी मानवाला या स्तोत्रमंत्रांचा आधार
या स्तोत्र मंत्राचा विज्ञानाशी ताळमेळ साधून
नाविन्यपूर्ण पुस्तकाची रचना झाली त्यातून
स्वामीजींच्या चिंतन मननाची झाली फलप्राप्ती
विचारमंथनाने घडवून आणली अभिनव क्रांती
स्तोत्र मंत्राचे विज्ञानाशी तारतम्य साधले
'स्तोत्र मंत्राचे विज्ञान' पुस्तक नांवरूपा आले
आधीव्याधीला त्रासून हात टेकले ज्यांनी ज्यांनी
मार्गदर्शन घेतले या पुस्तकातून त्यांनी त्यांनी
ज्या सद्‌गुरूंनी जन्म-मरणाचा फेरा चुकविला
आणि याच जन्मी मोक्षप्राप्तीचा मार्ग दाविला
अशा वत्सल गुरूमुर्तीचे पांग कसे फेडावे
'गुरूर्बह्मा गुरूर्विष्णु' म्हणून उतराई व्हावे
कृतज्ञतेची पुष्पांजली वाहण्या गुरूचरणावर
नतमस्तक सदा आंतरीक भाव अन् दोन्ही कर
गुरूनिष्ठा, गुरूप्रेम, गुरूआज्ञा, गुरुसेवा
साधनेचे सार पुस्तकी असे अमुल्य ठेवा
फसगत झालेल्या साधकासाठी जणू दिवादांडी
संकल्प-विकल्प मनातील दूर दूर सांडी
सोळा संस्काराच्या तोरणांनी प्रपंच सजवावा
प्रपंच करता-करता प्रभूचा महिमा गात जावा
धर्म-अर्थ-काम-मोक्षाची विशिष्ट संरचना
भारतीय संस्कृतीचा हाच तर पायाभरणा
संस्काराच्या संवर्धनाचा यत्न केला पाहिजे
संस्कार जपून **'सर्व सुखासी पात्र होईजे'**
प्रकृती-पुरूषाच्या संयोगाने सृष्टीची रचना
कुर्यात सदा मंगलम् ची मंगल असे भावना
पेराल ते उगवेल हा तर नियम या सृष्टीचा
दोष काढावा इतरांचा, हा दोष असे दृष्टीचा
स्वामीजी म्हणती, कृतघ्न होऊन जगणे नाही बरे
सुख देऊन सुखी व्हा आणि **'नांदा सौख्य भरे'**
प्रचितिचा गोडवा भक्ताशिवाय अन्य कोणा कळे
मधमाशी झाल्यावर मधुसेवनाचा आनंद मिळे
अनुभुतीच्या या विश्वाचे रूप लोभसवाणे
स्वामीजी म्हणती, **'हे तो प्रचितीचे बोलणे'**

संसारातील प्रेम मोह-मायेत अडकवते
ईश्वरावरील प्रेम भवसागर तारून नेते
विशुद्ध प्रेमात स्वर्गीय आनंदाची अनुभूती
प्रेम भक्ती जुळ्या बहिणी एक स्पर्श एक कृती
प्रेमसागरात डुबकी मारून निश्चित राही
'प्रेमाचे डोही अध्यात्म तरंग' उमटतील पाही
साधनापथावर रोज हजारो चालती साधक
मार्गातील त्या काही चुका साधकास होती बाधक
साधकाच्या कल्याणार्थ चुकांचे निरसन व्हावे
तळमळ त्यांची साधकाने सदा सावध असावे
वात्सल्यमुर्ती स्वामीजींच्या अंतरी उर्मी उठे
'साधनापथावर चालतांना चुकते कुठे' कुठे
'नको खेद करू कोणत्या गोष्टीचा', ही उक्ती नाथांची
संदेशवाहिनी स्वामीजींच्या स्वानुभव गाथांची
चित्त असे पिलापाशी जरी आकाशी उडे घार
'इतुक्या जिवांचा करीतो सांभाळ' म्हणा वारंवार
चार आरसेमहाल जे प्रश्नांनी भरले काठोकाठ
त्या दर्पणमहाली असती आरसे एकशे आठ
'स्व' चे परिक्षण करण्या बघावे प्रत्येक आरशात
स्वत:च आपण स्वत:चा करीत नाही ना घात?
विचारांच्या रणसंग्रामात साधक व्यथित होतसे
अंतर्मुख होऊन त्याचे भान हरपून जातसे
दया प्रेम करूणा समभाव सेवा परोपकार
यांची पदचिन्हे उमटवित साधना घेते आकार
स्वामीजींचे वाग्बाण सुटती साधकास हेरण्या
'प्रशन आमुचा उत्तर तुमचे' ही चक्रव्युह रचना
काम क्रोधाचा मन शरीरावर आक्रमक पवित्रा
तगमग होई साधकाची न चाले काही मात्रा
मोहरूपी महिषासूराचे कसे करावे निकंदन
अंतरद्वंद्व बाह्यद्वंद्वाने साधक करी आक्रंदन
'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' हा साधकाचा प्रवास
दक्षतेने करावा मायारूपी दैत्य दानवांचा विनाश
साधनेच्या विशिष्ट स्तरावरील मुमक्षु साधकासाठी
'दुर्गा सप्तशती रहस्य' विशद करती स्वामीजी
भगवद्‌गीतेचा सौंदर्यगाभा रचनेत सामावला
स्वामीजींच्या रसग्रहणाने मन:पटलावर कोरला
व्यासांच्या गीता रचनेचा टिपला प्रत्येक बारकावा
स्वामीजींच्या ज्ञानचक्षुंचा हा ठोस पाठपुरावा
'ओंजळीतील चंद्र' लडिवाळपणे लाजून बोलला
योग्य हाती सामाऊन मज अत्यानंद जाहला
पुस्तकरूपी ज्ञानगंगेत सचैल करून स्नान
तृषीत साधक भागवी जन्मोजन्मीची तहान
अधाशी वाचक म्हणे तीळा तीळा दार उघड
ज्ञानरूपी खजिना लुटण्या एकच उडे झुंबड
स्थितप्रज्ञ असुनही दीनांचा तुज कळवळा
म्हणे गुरूमाऊली, बुडता हे जन देखवेना डोळा
नाही अपेक्षा, संग्रहवृत्ती, नसे धनाची लालसा
शुद्ध हेतू माणसाने संस्कृतीचा जपावा वारसा
नको खुशामत आणि अवडंबर नको तो मुखवटा
साधेपणाचा अथांग सागर उजळी मोक्षाच्या वाटा
स्पष्ट वक्ता, जिज्ञासू वृत्तीला परखडपणाची जोड
तुझ्या अभयादी दैवी गुणांना संसारी नसे तोड
अज्ञानतिमीराचा नाश करूनी संपविशी तू निशा
सहस्त्ररश्मी गगनी येता उजळती दाही दिशा
अशा माझ्या ज्ञानसवितेस अर्घ्य शरणागतीचे
तव महिमा शब्दात गुंफणे काम नाही मतीचे
प्रांजळपणे कबुली ही सेवेत करते कुचराई
पुन्हा पुन्हा विनविते तुजला होऊ कशी उतराई
साधनेत अडसर येता अन्य कुणाला स्मरू
तूच माझी भाग्यदेवता तूच माझा कल्पतरू
तुझा ध्यास तुझी आस अन्य कोणती साधना करू
चरण तुझे नौका माझी, म्हणे **गुरूमाऊलीची सरू.**